Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, 539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004**
**दूरध्वनी क्र** - (0231) 2696101 / 2 / 3 **Website** - www.sscboardkolhapur.in **Email** - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं / लेखा / परीक्षा फी / जुलै-ऑगस्ट 2024 / 689    दिनांक : 31 / 05 / 2024

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय : जुलै-ऑगस्ट** 2024 **माध्यमिक (इ.**10 **वी) प्रमाणपत्र परीक्षेचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन** Download **करून चलनावरील** Bank of India Virtual Account **मध्ये** NEFT / RTGS **द्वारे भरणा करणेबाबत.**

**संदर्भ : राज्य मंडळाचे क्र. रा.मं. / परीक्षा-3 / 2095, दिनांक** 30.05.2024 **चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, जुलै / ऑगस्ट 2024 माध्यमिक शालान्त (इ.10 वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे नियमित शुल्कानुसार सादर करणेकरिता दि.31.05.2024 ते दि.11.06.2024 व विलंब शुल्कानुसार दि.12.06.2024 ते 17.06.2024 पर्यत संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केल्यानंतर बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **माध्यमिक शाळांनी चलन Download करून शुल्क भरण्याच्या तारखा** | **शनिवार दिनांक 01 जून 2024 ते बुधवार दिनांक 19 जून 2024** |

या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे सादर केलेल्या **सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील Bank of India Virtual Account मध्ये NEFT / RTGS द्वारे भरावयाचे आहे.**

***निळया चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्यात येवू नये***

तसेच NEFT / RTGS द्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही काही तांत्रिक कारणामुळे सदर रक्कम मंडळाच्या बँक खात्यात जमा न होता संबंधित शाळेच्या बँक खात्यात परत (Return) जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

***** तरी सर्व माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क NEFT / RTGS द्वारे भरणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी बॅक स्टेटमेंटची पडताळणी करून परीक्षा शुल्काची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करावी. जर परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा न होता आपल्या खात्यात जमा झाली असल्यास त्वरीत सदर परीक्षा शुल्काची रक्कम संगणकीय चलनावरील Virtual Account मध्ये पुन:श्च NEFT / RTGS द्वारे भरणा करण्याची दक्षता घ्यावी.**

(सुभाष चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर